अनुकंपा तत्वावर शिक्षण सेवक (प्रशिक्षीत) या पदावर नियुक्ती देणेबाबत (मराठी माध्यम) प्राथमिक स्तर (इ.1ली ते 5 वी)

जिल्हा परिषद अहिल्यानगर
सामान्य प्रशासन विभाग
जिल्हा परिषद आदेश क्र. कार्या-1/पीई-1/ 1401 /2026
अहिल्यानगर, दिनांक स्वाक्षरीखाली नमुद प्रमाणे

संदर्भ -

1) सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र.अकंपा-1217/प्र.क्र.102/आठ दि. 21 सप्टेंबर, 2017 व शासन निर्णय दि. 10/06/2019
2) ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र शासन, शासन परिपत्रक क्र.अकंपा-611/प्र.क्र.327/आस्था-7 दि. 17 सप्टेंबर, 2018
3) ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र शासन, शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-2018/ प्र.क्र.173/आस्था-8 दि. 28 सप्टेंबर, 2018
4) वित्त विभाग, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र.अनियो/1005/126/सेवा-4, दि. 31/10/2005
5) शालेय शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र.पीआरई/2003/3395/ प्राशि-1, दि.27 फेब्रुवारी, 2003
6) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र.1993/प्र.क्र.92/आस्था-9 दि.04 एप्रिल, 2003
7) महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम 1967 मधील परिशिष्ट 4 (9)
8) शालेय शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र.संकीर्ण-2015/प्र.क्र.303/टिएनटी-1 दि.20 जानेवारी 2016
9) शालेय शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र.संकीर्ण-2018/प्र.क्र.397/टिएनटी-1 दि.07 फेब्रुवारी 2019
10) शालेय शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र.संकीर्ण-2018/प्र.क्र.397/टिएनटी-1 दि.25 फेब्रवारी 2019
11) शालेय शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, शासन शुध्दीपत्रक क्र.संकीर्ण -2018/ प्र.क्र.397/टिएनटी-1 दि. 16 मे 2019
12) शालेय शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, शासन शुध्दीपत्रक क्र.संकीर्ण-2018/प्र.क्र.397/टिएनटी-1 दि.12 जुन 2019
13) सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र.अकंपा-1219/प्र क्र 56/आठ दि.11 सप्टेंबर 2019
14) ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र शासन, शासन पत्र क्र.संकीर्ण-2018/ प्र.क्र.173/आस्था-8 दि. 04 फेब्रुवारी, 2020
15) ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र शासन, शासन पत्र क्र.संकीर्ण-2018/ प्र.क्र.173/आस्था-8 दि. 05 फेब्रुवारी, 2020
16) ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र शासन, शासन पत्र क्र.संकीर्ण-2020/ प्र.क्र.028/आस्था-8 दि. 18 मार्च 2020
17) ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र शासन, शासन पत्र क्र.अकंपा-2021/ प्र.क्र.248/आस्था-7 दि. 11 ऑक्टोबर, 2022
18) शालेय शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र.संकीर्ण-2020/ प्र.क्र.260/टिएनटी-1, दि.07 फेब्रुवारी, 2023
19) सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र. अकंपा-1225/ प्र.क्र.121/म.लो.आ. दि. 17 जुलै, 2025
20) ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र. अकंपा-2025/ प्र.क्र.442/आस्था-7 दि. 31 जुलै, 2025

21) सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन, शासन परिपत्रक क्र.अकंपा-1225/ प्र.क्र.194/म.लो.आ. दि. 22 ऑगष्ट, 2025

22) सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन, शासन परिपत्रक क्र.अकंपा-1225/ प्र.क्र.194/म.लो.आ. दि. 11 सप्टेंबर, 2025

23) श्रीम. नंदा मनोहर पारधी, यांचा अनुकंपा तत्वावर नियुक्ती मिळणेबाबतचा अर्ज दि. 13/03/2026

24) संबधीत गट विकास अधिकारी / विभाग प्रमुखांचा चौकशी अहवाल दि. 03/07/2026

25) अनुकंपा तत्वावर नियुक्ती संदर्भात दिनांक 14/10/2026 रोजीचे इतिवृत्त

उपरोक्त विषयान्वये कै. मनोहर माधव पारधी, हे/ हया उपाध्यापक या पदावर जिल्हा परिषद सेवेत कार्यरत असतांना त्यांचे दिनांक 18/12/2025 रोजी निधन झाल्याने त्यांचे पात्र वारसदार श्रीम. नंदा मनोहर पारधी, यांनी स्वतः अनुकंपा तत्वावर नियुक्ती मिळणेबावत संदर्भ क्र.23 अन्वये अर्ज या कार्यालयास सादर केला आहे. त्यानुसार सदर अनुकंपा प्रकरणाची संदर्भीय शासन निर्णयामधील निर्देशांच्या अधीन राहून छाननी व पडताळणी केलेली आहे.

श्रीम. नंदा मनोहर पारधी, हया महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम 1967 मधील परिशिष्ट 4 (9) तरतुदीनुसार व संदर्भीय शासन निर्णयातील तरतुदीनुसार शिक्षण सेवक गट-क या पदासासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता धारण करित असलेने शिक्षण सेवक गट-क (इयत्ता 1 ली ते 5 वी) या पदावर नेमणुकीसाठी पात्र आहेत.

त्यानुसार संदर्भीय शासन निर्णयानुसार मला प्रदान असलेल्या अधिकाराचा वापर करुन याद्वारे मी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर श्रीम. नंदा मनोहर पारधी यांना खालील विहीत अटी व शर्तींवर जिल्हा सेवेतील शिक्षण सेवक गट-क या सरळसेवेच्या पदावर अनुकंपा तत्वावर नियुक्त करीत आहे. सदर अटी व शर्ती मान्य असल्या वावत विहित नमुन्यातील हमीपत्र, जामीनपत्र त्यांनी हजर होतांना कार्यालय प्रमुखांना लिहून देणे बंधनकारक राहिल.

क्र.	अनुकंपा तत्वावर नियुक्त केलेल्या अर्जदाराचे नाव व पत्ता	निवडीचा प्रवर्ग	पदस्थापनेचे ठिकाण
1	2	3	4
1	श्रीम. नंदा मनोहर पारधी, पत्ता - मु.पो. धामणगांव पाट ता. अकोले जि. अहिल्यानगर	अनु. जमाती	जि.प. प्राथ. कोतुळ ता. अकोले

आपली शिक्षण सेवक या पदावर निवड खालील विहीत केलेल्या अटी व शर्तींवर करण्यात येत आहे. तशा अटी व शर्ती मान्य असल्याबाबत विहीत नमुन्यातील हमीपत्र आपण लिहून दिल्यानंतरच आपणास शिक्षण सेवक म्हणून नियुक्ती दिली जाईल.

अटी व शर्ती -

1) शिक्षण सेवक म्हणून आपली नियुक्ती खालील अटी व शर्तींच्या अधीन असेल. त्या अटी व शर्ती मान्य असल्याबाबत विहित नमुन्यातील हमीपत्र आपण लिहून दिल्यानंतरच आपणांस शिक्षण सेवक म्हणून नियुक्ती दिली जाईल.
2) सदरची नियुक्ती निव्वळ तात्पुरत्या स्वरुपातील आहे. अर्जदाराने अनुकंपा प्रकरणी सादर केलेले कागदपत्र बनावट अथवा खोटी असल्याचे भविष्यात निदर्शनास आल्यास सदरची नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल.
3) सदर नियुक्ती संदर्भात भविष्यात कोणत्याही प्रकराचा वाद अथवा न्यायालयीन वाद उदभवल्यास सदरची नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल.
4) नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून 30 दिवसात रूजू न झाल्यास आपली नियुक्ती रद्द झाली आहे असे समजून आपला अनुकंपा तत्वावरील नियुक्तीबाबतचा हक्क संपुष्टात येईल.
5) शिक्षण सेवक म्हणून नियुक्तीचा कालावधी 3 वर्षे इतका राहील. तसेच शिक्षण सेवकांना दिर्घ सुट्टीसह पूर्ण शैक्षणिक वर्षातील 12 महिन्याचे मानधन अनुज्ञेय राहील.
6) शिक्षण सेवकाला सेवेत सामावून घेण्यासाठी शिक्षण सेवक या पदावर 3 शैक्षणिक वर्षे समाधानकारक काम केल्यानंतर संबंधित उमेदवाराला प्राथमिक शिक्षकांच्या नियमित पदावर नियमित वेतनश्रेणीत नियुक्ती देण्यात येईल.
7) शालेय शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र.पीआरई-2002/3395/प्राशि-1, दि. 27 फेब्रुवारी, 2003, जोडपत्र-अ मधील परिच्छेद 14 अन्वये अनुज्ञेय धरलेला अनुपस्थितीचा कालावधी वगळता अन्य अनुपस्थितीचा कालावधी कर्तव्यार्थ कालावधी म्हणून गणला जाणार नाही.
8) शिक्षण सेवक म्हणून आपणास अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या कोणत्याही प्राथमिक शाळेत काम करावे लागेल.
9) नियुक्तीच्या कालावधीमध्ये आपण कोणत्याही स्वरूपाचे गैरवर्तन केल्यास आपली नियुक्ती रद्द करण्यात येईल.

10) नियमित स्वरूपात नियुक्ती केलेल्या प्राथमिक शिक्षकांच्या किंवा शासकीय कर्मचाऱ्यांच्या सुविधा आपणास देय असणार नाही.
11) आपणास राजीनामा द्यावयाचा असल्यास एक महिन्याची नोटीस द्यावी लागेल राजीनामा दिल्यास अथवा मध्येच नोकरी सोडून दिल्यास मागील सेवेचा फायदा 3 वर्षाचा कालावधी परिगणीत करताना मिळणार नाही.
12) प्रशिक्षित शिक्षण सेवक म्हणून आपणास दरमहा रूपये 16,000/- एवढे मानधन दिले जाईल.
13) नियुक्तीच्या कालावधीत आपणास खालील कर्तव्य पार पाडावी लागतील.

a) संबंधित गावातील शाळेत जाण्यायोग्य वयाच्या सर्व मुलांना शाळेमध्ये दाखल करून घेण्याच्या तसेच विद्यार्थ्यांची शाळेतील उपस्थिती टिकविण्याच्या दृष्टीने पालकांशी संपर्क ठेवणे.
b) शाळेमध्ये दररोज संपूर्ण शालेय कालावधीमध्ये नियमित व वेळेवर उपस्थित राहणे.
c) अभ्यासक्रमामध्ये नमूद केल्याप्रमाणे आवश्यक ते शैक्षणिक साहित्य निर्माण करणे.
d) नेमून दिलेल्या वर्गाचे विहित कार्यपध्दतीनुसार अध्यापन करणे.
e) शासनाने आवश्यक केलेल्या प्रशिक्षणास उपस्थित राहणे.
f) शाळेचे मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख व शिक्षण विस्तार अधिकारी व गट शिक्षणाधिकारी यांच्या नियंत्रणाखाली काम करणे व शैक्षणिक बाबीबावत त्याच्या आदेशाचे पालन करणे.
g) वर्गातील विद्यार्थ्यांचे सातत्यपूर्ण व सर्वंकष मूल्यमापन करणे.
h) शैक्षणिक व इतर उपक्रमांच्या (क्रीडास्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा इत्यादी) आयोजनामध्ये सहभागी होणे.

14) महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे या कार्यालयाकडून आपले डी.एड. चे गुणपत्रक आणि प्रमाणपत्र, टी.ई.टी./ सी.टी.ई.टी. प्रमाणपत्र यांची पडताळणी करून ते वैध असल्याबावतचे प्रमाणपत्र दिल्यानंतरच आपली नियुक्ती पुढे चालू राहील. अन्यथा आपली सेवा समाप्त करण्यात येईल.
15) शिक्षण सेवक पदावर रुजू झालेच्या दिनांकापासून दोन महिन्याचे आत जिल्हा शल्य चिकित्सक, अहमदनगर यांचेकडील शारिरिक दृष्टया पात्रते संबंधीचे वैद्यकीय प्रमाणपत्र नेमणुकीचे कार्यालयास सादर करणेत यावे.
16) अनुकंपा धारकारने सादर केलेल्या प्रतिज्ञापत्राच्या आधारे व गट विकास अधिकारी यांचेकडील प्राथमिक चौकशीच्या आधारे सदर नेमणूक देण्यात आलेली आहे. भविष्यात सदर प्रतिज्ञापत्रामध्ये गैरप्रकार केल्याचे आढळल्यास अथवा मयत कर्मचारी यांचे कुटुंबातील इतर वारस यांचा सांभाळ न केल्यास अथवा इतर वारसाची तक्रार अथवा हरकत प्राप्त झाल्यास सदरील अनुकंपा नियुक्ती समाप्त करण्यात येईल याची नोंद घ्यावी.
17) सदरची नियुक्ती सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय दि. 28 ऑगष्ट, 2017 अन्वये शासन सेवेत नेमणूक करताना उमेदवाराने सादर केलेली माहिती असत्य आल्याचे आढळून आल्यास तात्पुरते नियुक्तीपत्र रद्दबादल करून शासन सेवेत कायमस्वरूपी अपात्र ठरविण्यात येईल या अटीवर चारित्र पडताळणीचे अधिन राहून देण्यात येत आहे. कार्यालय प्रमुख यांनी सदर उमेदवारांचे चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र दोन महिन्यांचे आत प्राप्त करुन घ्यावेत व त्याची नोंद सेवापुस्तकामध्ये घेण्यात यावी. यामध्ये एखादी गंभीर बाव केल्हाही निदर्शनास आल्यास कोणतेही कारण न देता सेवा समाप्त करण्यात येईल.
18) जिल्हा परिषदेच्या सेवेत रुजू होण्यापूर्वी भारतीय संविधानास एकनिष्ठ राहण्याची शपथ शिक्षण विस्तार अधिकारी/ मुख्याध्यापक यांचे समोर घ्यावी लागेल.
19) नेमणूकीच्या ठिकाणी हजर होणेकरीता कोणत्याही प्रकारचा प्रवास भत्ता दिला जाणार नाही.
20) आपण विवाहित असल्यास तुम्हाला एकच पती/ पत्नी आहे असे गृहित धरुन नियुक्ती देण्यात येत आहे. एकापेक्षा जास्त पती/ पत्नी असल्याचे निदर्शनास आल्यास तुमची सेवा समाप्त करण्यात येईल.
21) महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) (सुधारणा) नियम 2021 नुसार उमेदवाराने नियुक्तीचे वेळी खात्रीशीर कागदपत्री पुराव्यासह जन्म तारीख घोषीत करील. जेव्हा नियुक्तीची विहीत शैक्षणिक अर्हता ही माध्यमिक शालांत परिक्षा किंवा त्यावरील असेल, अशा बाबतीत, माध्यमिक शालांत परिक्षा प्रमाणपत्र हे वैध दस्ताऐवज असल्याचे मानण्यात येईल.अन्य बाबतीत स्थानिक स्वराज्य संस्थेचे निर्गमित केलेले जन्म प्रमाणपत्र किंवा ज्या शाळेत तो शेवटी शिकत होता, अशा मान्यता प्राप्त शाळेचे प्रमाणपत्र हे वैध दस्तऐवज असल्याचे मानण्यात येईल. त्यानुसार उमेदवाराचे

जन्म तारखेचे परिशिष्ठ-5 अ मध्ये हमीपत्र देईल. त्यानंतर खंड वी मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे शासकीय सेवेत प्रवेश केल्याच्या दिनांकापासून एक वर्षाच्या कालावधीनंतर अर्ज स्वीकारण्यात येणार नाही.

22) शिक्षण सेवक पदावर नेमणूक दिल्यानंतर शाळा/ तालुका बदलून मिळण्यासाठी कोणत्याही प्रकारे पत्रव्यवहार केल्यास अथवा दबाव आणल्यास आपणास कोणतेही कारण न देता आपली नियुक्ती रद्द करण्यात येईल.

23) सदर नियुक्तीच्या कालावधीमध्ये आपणास महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय, शासन परिपत्रक, शासन अधिसूचना तसेच वेळोवेळी मुख्य कार्यकारी अधिकारी देतील अशा सर्व निर्देशाचे तंतोतंत पालन करणे आपणास बंधनकारक राहील.

24) कार्यालय प्रमुखांना खालील नामनिर्देशनपत्र देण्यात यावीत 1.वैद्यकीय दाखला, 2.जातीचा दाखला, 3.जातीचे वैधता प्रमाणपत्र, 4.स्वग्राम घोषणापत्र, 5.शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता प्रमाणपत्र मुळ सेवापुस्तक भरताना उपरोक्त कागदपत्रे डकविण्यात यावी ती डकविण्यात आली आहे किंवा नाही याची खात्री स्वत: करुन घ्यावी.

25) सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय दि.19 मार्च 2003 नुसार संगणक अर्हता/ एम.एस.सी.आय.टी अथवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र नियुक्ती मिळालेपासून दोन वर्षात उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. अन्यथा हा कालावधी संपताच उमेदवाराची नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल. त्यानुसार खातेप्रमुख, कार्यालय प्रमख यांनी सदर कर्मचाऱ्यास कार्यमुक्त करावे.

26) सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन, शासन परिपत्रक दि. 01/07/2005 अन्वये दोन पेक्षा अधिक मुले असणाऱ्या उमेदवारांना शासन सेवेत नियुक्ती देण्यात प्रतिबंध करण्यासाठी महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंब प्रतिज्ञापत्र) नियम 2005 नियुक्त्यासाठी अधिसूचनेत विहीत केलेली लहान कुटुंबाची अतिरिक्त अट लागू झालेली आहे. त्याअनुषंगाने सदर नियमातील प्रतिज्ञापत्र नमुना-अ नुसार उमेदवाराकडुन प्रतिज्ञापत्र कार्यालय प्रमुखाने भरुन घ्यावे. सदर नियमानुसार दि. 28/03/2005 नंतर तिसरे अपत्य असणाऱ्या उमेदवाराची नियुक्ती रद्द करण्यात येईल.

27) आपण मागासवर्गीय असल्यास शासन निर्णय दि.12 डिसेंबर 2011 नुसार आपणास नियुक्ती आदेशाच्या तारखेपासून सहा महिन्याच्या आत जातपडताळणी समितीकडुन जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील अन्यथा आपली नियुक्ती रद्द करण्यात येईल.

28) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय दि. 08 जुन, 2006 अन्वये शासकीय कर्मचारी व अधिकारी यांना शौचालयाचा वापर करणे अनिवार्य करणेत आलेले आहे. त्यानुसार कार्यालय प्रमुख यांनी उमेदवाराकडुन शौचालय असलेवावत व त्याचा वापर करीत असलेवावत प्रमाणपत्र एक महिन्याचे आत घ्यावे.

29) ग्राम विकास विभाग, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय दि.13 जुन 2017 अन्वये राष्ट्रीय निवृत्ती योजना लागू ठरेल. मात्र सध्या अस्तित्वात असलेली निवृत्ती वेतन योजना म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम 1982 व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण) नियम 1984 आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण / जिल्हा परिषद भविष्य निर्वाह निधी योजना लागू होणार नाही. यासंदर्भात शासना मार्फत वेळोवेळी निर्गत होणारे शासन निर्णय/ परिपत्रक/ आदेश आपणास बंधणकारक राहतील.

30) वित्त विभाग, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय दि. 31/03/2023 अन्वये परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना/ राष्ट्रीय निवृत्ती प्रणाली अंतर्गत कर्मचाऱ्यांचा सेवा कालावधीत मृत्यु झाल्यास त्याच्या कुंटुंवियांना कुटुंव निवृत्तीवेतन आणि मृत्यु उपदान व रुग्णता सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्याला रुग्णता निवृत्तीवेतन आणि सेवानिवृत्ती उपदान तसेच शासन सेवेतून निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती उपदान लागू होईल. त्याकरिता आपण शासन सेवेत नियुक्त झाल्यावर आठ दिवसाच्या आत विकल्प कार्यालयास सादर करणे आवश्यक राहील.

31) महिला व बाल विकास विभाग, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय दि. 6 एप्रिल 2023 अनाथ आरक्षणाचा लाभ घेऊन शासन सेवेत रुजू होणाऱ्या उमेदवारांनी नियुक्ती आदेशाच्या तारखेपासून सहा महिन्याच्या आत आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांचेकडुन अनाथ प्रमाणपत्राची पडताळणी करुन प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील अन्यथा आपली नियुक्ती रद्द करण्यात येईल.

32) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय दि.21 जुन, 2023 अन्वये आपणास जिल्हा बदलीचा हक्क राहणार नाही, तथापि नव्याने नियुक्तीनंतर इतर जिल्हयांत जाऊ इच्छिणऱ्या शिक्षकांने रितसर राजीनामा देऊन पुन्हा विहीत प्रक्रीयेच्या माध्यमातुन आवश्यकतेनुसार शिक्षक अभियोग्यता व वुध्दीमत्ता चाचणी परीक्षा देऊन त्यातील गुणवत्तेच्या आधारे पवित्र पोर्टलव्दारे शिक्षक म्हणून नियुक्ती मिळविणे आवश्यक राहील.

33) मा.आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे-1 यांचेकडील दि.28 जानेवारी 2024 चे पत्रान्वये सेमी इंग्रजी शाळांकरीता इंग्रजी माध्यमातुन व्यावसायिक अर्हता धारण करणाऱ्या नियुक्त शिक्षण सेवकाच्या नियुक्तीनंतर शिक्षण सेवक कालावधीमध्ये त्यांची कौशल्य चाचणी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या अधिनस्त प्रादेशिक विद्या प्राधिकरण, छत्रपती संभाजीनगर या इंग्रजी भाषेशी संबंधित संस्थेकडुन घेण्यात येणार आहे. सदर कौशल्य चाचणीतील गुणवत्तेनुसार संबंधित शिक्षण सेवकांचे कौशल्य/ ज्ञान असमाधानकारक असल्याचे आढळल्यास आपली सेवा समाप्त करण्यात येईल.

सदरचा आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक क्रमांक 202610151600 82 असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 15-10-2026 20:57:56
आनंद भंडारी (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्रीम. नंदा मनोहर पारधी,
मु.पो. धामणगांव पाट
ता. अकोले जि. अहिल्यानगर

प्रत :- माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव रवाना.

1. गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती अकोले

   2/- संबंधित अनुकंपा उमेदवार शिक्षण सेवक पदावर हजर होणेस आल्यानंतर आदेशात नमुद केल्याप्रमाणे प्रथम त्यांची शैक्षणिक अर्हतेची मुळ प्रमाणपत्रावरुन खात्री करुन घ्यावी व हजर करुन घ्यावे. तसेच रुजु अहवाल व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल इकडेस सादर करावा.
2. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, अहिल्यानगर
3. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि), जिल्हा परिषद अहिल्यानगर
4. शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद अहिल्यानगर
5. गट विकास अधिकारी, पंचायत समिती अकोले
6. मुख्याध्यापक जि.प.प्राथ.शाळा कोतुळ, ता. अकोले जि.अहिल्यानगर

स्वाक्षरीत/-
आनंद भंडारी (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर